**<u>प्रेस नोट</u>** दि.11/09/2024

# शहरातील ड्रोन प्रतिबंधित क्षेत्रात विनापरवाना ड्रोन उड्डाण करुन चित्रीकरण करणाऱ्या इसमांवर गुन्हे दाखल

---

छत्रपती संभाजीनगर हे ऐतिहासिक शहर असुन शहराचा काही भाग हा ड्रोन प्रतिबंधीत क्षेत्रात आहे. शहरातील अतिमहत्वाचे ठिकाण, पर्यटन स्थळे, प्रेक्षणीय स्थळे इतर महत्वाच्या ठिकाणांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन सदर ठिकाणी विनापरवाना ड्रोन उड्डाण करण्यास प्रतिबंध pआहे.

असे निदर्शनास आले आहे की, प्री-वेडींग शुटींग, सोशल मिडीयावर व्हीडीओ प्रसारीत करण्यासाठी शहरामध्ये ड्रोन प्रतिबंधीत क्षेत्रात विनापरवाना ड्रोन उड्डान करुन चित्रीकरण केले जात आहे. ड्रोन उड्डानामुळे शहरात लोकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे.

मा.पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी आयुक्तालय हद्दीत भारतीय नागरी सुरक्षा संहिता-2023 चे कलम 163 अन्वये ड्रोन उडविण्यास बंदी घातलेली आहे. दि.23/08/2024 रोजी मा.पोलीस आयुक्त श्री.प्रविण पवार साहेब यांनी शहरातील ड्रोन मालक/ चालक, प्री-वेडींग शुटींग करणारे, व्यवसायिक शुटींग करणारे, मंगल कार्यालय/ लॉन्स चे मालक/व्यवस्थापक याची बैठक घेवून बैठकीमध्ये त्यांना येलो झोन, रेड झोन, नियमानुसार ड्रोनचे रजिस्ट्रेशन करणे, ड्रोन उड्डान करण्यापुर्वी संबंधीत यंत्रणेची पुर्व परवानगी घेणे इत्यादी ड्रोन नियमावलीबाबत माहीती देण्यात आली. तसेच ड्रोन प्रतिबंधीत क्षेत्रात विनापरवाना ड्रोन उड्डान केल्यास त्यांचेवर भारतीय न्यायसंहिता-2023, ड्रोन अधिनियम 2021, वायुयान अधिनियम 1934 या कायद्यातर्गत कारवाई करण्यात येईल अशी तंबी दिली होती.

त्याअनुशंगाने सायबर पोलीस स्टेशनचे अधिकारी/अंमलदार दररोज सोशल मिडीयावर पेट्रोलींग करुन ड्रोनद्वारे चित्रीकरण करुन व्हीडीओ प्रसारीत करणाऱ्या इसमांवर लक्ष ठेवत आहे.

दि.10/09/2024 रोजी सोशल मिडीया पेट्रोलींग दरम्यान काही इन्स्टाग्राम खातेधारकांनी त्यांचे इन्स्टाग्राम खात्यावर बिबि-का-मकबरा, दौलताबाद किल्ला, सोनेरी महल तसेच शहरातील इतर ड्रोन प्रतिबंधीत पर्यटन/प्रेक्षणीय स्थळाचे ड्रोनद्वारे चित्रीकरण केल्याचे निदर्शनात आल्याने सदर इन्स्टाग्राम खातेधारकांची तांत्रिक व गोपनिय माहीतीच्या आधारे शोध घेवून सदर इन्स्टाग्राम खाते धारक नामे (01) इसम नामे महंमद इकरामोददीन महंमद मुस्तफा शरीफ , वय-29 वर्ष, रा. घर नं. 3-1-36/11, बारूदगर नाला, औरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर (02) मोहम्मंद मोईनोद्दीन मोहम्मद इरफान, वय-18 वर्ष, रा.फतेसिंगपुरा, यशोधरा कॉलनी,एन-8 छत्रपती संभाजीनगर (03) शेख मुद्दसीर शेख रज्जाक रा.छत्रपती संभाजीनगर (04) खान रेहान इरफान, वय-25 वर्ष, रा.एच-एन 5-2- चंपा मस्जिदजवळ, कैसर कॉलनी चंम्पा चौक, छत्रपती संभाजीनगर यांनी विनापरवाना ड्रोन प्रतिबंधीत क्षेत्रात ड्रोनद्वारे चित्रीकरण केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे बेगमपुरा, पोलीस ठाणे दौलताबाद येथे गुन्हे दाखल करण्यात आले.

कोणीही इसम पोलीस आयुक्तालय हद्दीत विनापरवाना ड्रोन प्रतिबंधीत क्षेत्रात ड्रोन उड्डान करतांना मिळून आल्यास त्या इसमावर भारतीय न्यायसंहिता-2023, ड्रोन अधिनियम 2021, वायुयान अधिनियम 1934 या कायद्यातर्गत कारवाई करण्यात येईल तसेच अश्या प्रकारे कोणी इसम प्रतिबंधीत क्षेत्रात विनापरवाना ड्रोन उड्डाण करतांना मिळुन आल्यास पोलीस ठाणे सायबर येथे माहीती द्यावी असे आवाहन मा.पोलीस आयुक्त साहेब यांनी केले आहे.

सदरची कामगिरी मा.श्री.प्रविण पवार, पोलीस आयुक्त, मा.श्री.प्रशांत स्वामी, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री.सुभाष भुजंग, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे), श्रीमती. गिता बागवडे, पोलीस निरीक्षक पो.स्टे. सायबर, छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.स्टे.सायबरचे सपोनि/कदीर देशमुख, पोउपनि/कैलास अन्नलदास, पोअं/राहुल काळे, पोअं/अल्ताफ पठाण यांनी केली.

SD/-
**(प्रशांत स्वामी)**
**पोलीस उप-आयुक्त, गुन्हे**
**छत्रपती संभाजीनगर**